# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १२/०७/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

## पोलिस स्टेशन केळवद हद्दीत स्कॉर्पिओ गाडी पुरात वाहल्याने सहा लोकांचे मृत्यु

पोलिस स्टेशन केहवद हद्दीमध्ये दिनांक १२/०७/२०२२ चे १४.०० वा. ते १५.३० वा. सुमारास मौजा नांदागोमुख ते छत्रापुर रोडवरील ब्राम्हणमारी नाल्याचे पुलावरून एमएच–३१/सीपी–०२९९ क्रमांकाची स्कॉर्पिओ गाडी ज्यात ६ प्रवासी बसलेले होते. ते सर्व झिंगाबाई टाकळी नागपूर येथुन नांदागोमुख येथे राहणारे ढोक परिवार यांचे घरी कार्यक्रमा निमित्याने आले होते व ते सदरचा कार्यक्रम आटोपून मुलताई (मध्यप्रदेश) येथे जात असतांना पुलावरून पुराचे पाणी वाहत होते. वाहत असलेल्या पाण्यातुन स्कॉर्पिआ वाहन चालकाने आपले वाहन वाहत्या पाण्यात टाकले त्यामुळे सदर वाहन पुलावरून नदीच्या पात्रात पडल्याने यातील असलेले प्रवाशी हे वाहनासह पाण्यात बुडून वाहुन गेले. त्यामध्यामधील ३ मृतक नामे– क्र. १. रोशनी नरेन्द्र चौकीकर वय ३५ वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी नागपूर, २. मधुकर पाटील वय ६० वर्ष, ३. निर्मला मधुकर पाटील वय ५५ वर्ष, दोन्ही रा. धतोरा, मुलताई (मध्यप्रदेश) यांचे प्रेत मिळुन आले. तसेच १. दादु नरेन्द्र चौकीकर, वय १३ वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी नागपूर, २. चालक विकास उर्फ बबलु डिवडे वय ३५ वर्ष, रा. झिंगाबाई टाकळी नागपूर, ३. निमु आठनेरे, वय ४५ वर्ष, रा. जामगाव यांचा शोध मोहिम सुरू असून अद्याप मिळुन आलेले नाही.

सदर घटनास्थळी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर व उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री अजय चाँदखेडे यांनी भेट दिली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर